महाराष्ट्र शासन

क्र. विविचा-२००७ /प्र.क्र. ५१ भाग(१)/गृनिप
गृहनिर्माण विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १ जून, २०१६.

प्रति,

उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,
तथा सदस्य सचिव, शक्ती प्रदत्त समिती
गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.),
मुंबई - ४०० ०५१.

विषय :- म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग (बीडीडी) चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि. १३.०५.२०१६ रोजी झालेल्या "शक्ती प्रदत्त समितीच्या" पहिल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

संदर्भ :- आपले जा. क्र. मुंमं/उमुअ/बीडीडी/ न.क्र.०७/गोप-२/१६, दि. १७.०५.२०१६ चे पत्र

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपल्या दि. १७.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये म्हाडामार्फत मुंबई विकास विभाग (बीडीडी) चाळींच्या पुनर्विकासाबाबत दि. १३.०५.२०१६ रोजी झालेल्या "शक्ती प्रदत्त समितीच्या" पहिल्या बैठकीचा कार्यवृत्तांत शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. तथापि सदर कार्यवृत्तामध्ये नमूद केलेल्या निर्णयाच्या मजकूरामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा / बदल करुन त्यास मंजूरी देण्यात आली आहे.

| अ. क्र. | विषय /चर्चा | म्हाडाच्या अहवालात नमूद निर्णय | निर्णयात करावयाची सुधारणा |
|---|---|---|---|
| १ | म्हाडाने सदर प्रकल्पाकरिता विहित पध्दतीचा अवलंब करुन वास्तुशास्त्रज्ञ सल्लागारांच्या लघुयादीतून एका वास्तूशास्त्रज्ञ सल्लागाराची अंतिम नियुक्ती करणे | म्हाडाने नियुक्त केलेल्या तज्ञ समितीने ज्या निकषांच्या आधारे वास्तुशास्त्रज्ञ सल्लागारांची क्रमवारी केलेली आहे ती पाहता वरळी, ना. म. जोशी मार्ग - परेल, नायगांव या तीन ठिकाणच्या प्रथम क्रमांक प्राप्त झालेल्या वास्तुशास्त्रज्ञ सल्लागाराच्या नेमणूकीस मंजूरी देण्यास हरकत नसावी, असे मुख्य सचिव तथा अध्यक्ष, शक्ती प्रदत्त समिती यांनी नमूद केले. त्यास सर्व समिती | म्हाडाने नियुक्त केलेल्या तज्ञ समितीने शिफारस केलेल्या वास्तुशास्त्रज्ञ सल्लागारांपैकी वरळी येथील बी.डी.डी. चाळींकरिता शिफारस करण्यांत आलेल्या तीन वास्तु शास्त्रज्ञांच्या यादीतील प्रथम क्रमांकावरील वास्तुशास्त्रज्ञ सल्लागार श्री. विवेक भोळे, आर्किटेक्ट प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासंदर्भात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून गृहनिर्माण विभागाकडे प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने गृह विभागाने तपासणी करुन |

| | | | |
|---|---|---|---|
| | | सदस्यांनी संमती दर्शविली. | त्यांचे अभिप्राय द्यावेत व तद्नंतर बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाकरिता वास्तुशास्त्रज्ञ सल्लागारांच्या नियुक्तीबाबत अंतिम निर्णय घ्यावा असे ठरविण्यात आले. |
| २ | बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासातून उपलब्ध होणारे विविध उत्पन्न गटांकरिताचे रहिवासी गाळे | ---- | ---- |
| ३ | शिवडी येथील मुंबई बंदर न्यास या केंद्र शासनाच्या मालकीच्या जमिनीवरील बीडीडी चाळींचा पुनर्विकास | शिवडी येथील बीडीडी चाळींची ज़मीन ही केंद्र शासनाच्या मालकीची असल्यामुळे सदर बाबतीत मा. मुख्य सचिव यांचे स्वाक्षरीने "मुंबई बंदर न्यास" यांचेकडे दि. ३०.०३.२०१६ रोजीच्या बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाबाबत झालेल्या शासन निर्णयाप्रमाणे पुनर्विकास प्रस्तावाची विनंती पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यांत आली. | शिवडी येथील बीडीडी चाळींची जमीन ही केंद्र शासनाच्या मालकीची असल्यामुळे दिनांक ३०.०३.२०१६ रोजी बीडीडी चाळींच्या पुनर्विकासाबाबत निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदीप्रमाणे मुंबई बंदर न्यास/ केंद्र सरकार यांचेकडे पुनर्विकासाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विनंती करण्यांत यावी. |

तरी वरीलप्रमाणे सुधारणा करुन सुधारित कार्यवृत्त निर्गमित करण्यात यावे अशी विनंती आहे.

आपला

(म. रा. पारकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन